राखीव जागा संरक्षण समिती,
महाराष्ट्र
व्दारा आ. अॅड. डॉ. पाटील,
शेतकरी कामगार पक्ष कार्यालय
महात्मा फुले रस्ता, नायगांव
मुंबई ४०० ०१४

गुजरातमधील राखीव जागा विरोधी आंदोलनाच्या निमित्ताने आपल्या समाजातील मूलभूत आर्थिक सामाजिक प्रश्न पुन्हा एकदा उफाळून आले आहेत. या प्रश्नां वरुन दलित व दलितेतर या घटकांमध्ये तणाव निर्माण झाले असून त्यात दलितांवरील सामुहिक हल्ल्याचे स्वरुप आले आहे. ही परिस्थिती राष्ट्रीय ऐक्याला व सामाजिक न्याय व समता यांवर आधारलेल्या आपल्या लोकशाहीच्या प्रगतीला हानिकारक आहे. विशेषत: अल्पसंख्य दलित जाती जमातींच्या अस्तित्वाला या घटनांमुळे आव्हान निर्माण झाले आहे. मानवतेच्या दृष्टीनेही अशा घटना म्हणजे आपल्या समाजाला कलंक लावणाऱ्या आहेत म्हणून आम्ही गुजरात मधील आंदोलनाच्या नेत्यांना आंदोलन ताबडतोब थांबवावे असे आवाहन करतो.

दलित जातींसाठी राखीव जागांची व सवलतींची तरतूद करण्या मागचा उद्देश अद्यापि सफल झालेला नाही, अगदी अलिकडच्या काळात या सवलतींचे थोडे फार अनुकूल परिणाम दिसू लागले आहेत है परिणाम अधिक दृढमूल करण्याच्या दृष्टीने दलित जातींना सध्या देण्यात येत असलेल्या राखीव जागा व सवलती कायम राहिल्या पाहिजेत. या बाबतीत कोणतीही तडजोड करता कामा नयेत, परंतु राखीव जागांचे निमित्त करुन समाजात दुफळी व अशांतता माजवणारी आंदोलने उभी राहिलीत ही गोष्ट अतिशय खेदजनक आहे. दलितेतर वर्ग जातीच्या खऱ्या खुऱ्या प्रश्नांची चुकीच्या पध्दतीने मांडणी करुन त्यांची दिशाभूल करुन त्यांना भडकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. राखीव जागांविषयी वास्तव परिस्थिती डोळसपणे समजून घेणे आवश्यक आहे. प्रस्थापित हितसंबंधियांच्या या कारस्थानाला आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील युवकांनी बळी पडता कामा नये. या घटकातील लोकांना अनुकूल वातावरण व अधिक संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शिक्षण व नोकऱ्यांमध्ये सध्याच्या, राखीव जागां व्यतिरिक्तच्या जागांमध्ये योग्य त्या प्रमाणात प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी आम्ही करीत आहोत.

गुजरात आंदोलनाच्या मागोमाग महाराष्ट्रातही हे आंदोलन पसरवून लोकांमधील राखीव जागा संबंधीच्या गैरसमज व अज्ञानाचा वापर करून जातीय विद्वेषाचे विखारी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न काही शक्ती करीत आहेत. याचीही समिती गंभीर दखल घेत आहे. या प्रकारच्या प्रयत्नां मुळे समाज-विघातक शक्तींना बळ प्राप्त होणार असून सामाजिक परिवर्तनाला फार मोठा अडथळा निर्माण होणार आहे. म्हणून याविषयी आम्हाला चिंता वाटते.

राखीव जागांच्या प्रश्नांवर गुजरात, महाराष्ट्र राज्य सरकारे व केंद्र सरकार यांनी स्विकारलेल्या धोरणाचे आम्ही स्वागत करतो, परंतु या केंद्र व राज्य सरकारांनी आपली जबाबदारी ओळखून खंबीर धोरण घेण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात कोणत्याही प्रकारची संदिग्धता येथील प्रति-गामी शक्तींचेच बळ वाढवण्यास कारणीभूत होईल असे आमचे मत आहे. म्हणून केंद्र सरकारने लोकसभेत राखीव जागांच्या बाजूने ऐक्मताने संमत केलेल्या ठरावाच्या भूमिकेला ठामपणे चिकटून रहावे. राखीव जागांच्या प्रश्नाकडे कोणत्याही तात्कालीक राजकीय दृष्टिकोनातून न पाहता सामाजिक समतेच्या दूरगामी चळवळीतील महत्वाचा प्रश्न म्हणून सर्व राजकीय पक्ष व संघटनांनी पहावे .तसेच या निमित्ताने उभ्या राहणाऱ्या समाज विघातक प्रवृत्ती व प्रति गामी शक्ती चा विरोधात सर्व पुरोगामी शक्तींनी ऐक्जुटीने उभे रहावे व महाराष्ट्रात असे आंदोलन पसरू नये म्हणून सर्व शक्तीनिशी ऐकत्रितपणे प्रयत्न करावेत असे आवाहन राखीव जागा संरक्षण समिती करत आहे.

गुजरातमधील राखीव जागा विरोधी आंदोलनाच्या निर्माण झालेल्या परिस्थिती बाबत विचार करण्यासाठी दिनांक १४ व १५ मार्च रोजी युवक क्रांती दलाने आयोजित केलेल्या सर्व पक्षीय बैठकीत वरील समितीची स्थापना करण्यात आली या समितीची पहिली बैठक रविवार दिनांक २९ मार्च ८१ रोजी पुण्यात झाली. या समितीमध्ये खालील पक्ष व संघटना सामील झाल्या आहेत.

१) शेतकरी कामगार पक्ष
२) भारतीय कम्युनिस्ट पक्ष
३) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष
४) लाल निशाण पक्ष
५) जनता पक्ष
६) रिपब्लिकन पक्ष (गवई गट)
७) लोकदल
८) युवक क्रांती दल
९) समाजवादी मंच
१०) समाजवादी युवक दल
११) दलित पँथर
१२) मुस्लीम सत्यशोधक मंडळ
१३) छात्रयुवा, संघर्ष वाहिनी
१४) म. फुले समता प्रतिष्ठान

१५) श्रमिक संघटना | १६) दलित युवक आघाडी
१७) भूमि सेना | १८) श्रमिक मुक्ती दल
१९) राष्ट्र सेवा दल | २०) समाज परिवर्तन संस्था
२१) सत्यशोधक समाजवादी आंदोलन | २२) सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष
२३) भटक्या विमुक्त जाती संघ

त्यांच्या प्रतिनिधी मधून खालील कार्यकारी समिती नियुक्त करण्यात आली.

कार्यकारी समिती आ. एन डी पाटील ( (निमंत्रक
सुभाष लोमटे (

रामदास आठवले, एल डी भोसले, मृणाल गोरे, डॉ. गोविंद पानसरे, अहिल्या रांगणेकर, एम सय्यदभाई, बाबा आढाव, भास्कर जाधव, मोहन गुंजाळ, पार्थ पोळके, भाई वैद्य, वसंत काळे, प्रदीप वेलुरकर, बाजीराव कांबळे, दौलतराव भोसले.

पुढील कार्यक्रम : राखीव जागांबाबतची वस्तुस्थिती सर्व सामान्य जनतेला व विद्यार्थी छात्र: कॉलेज विद्यार्थ्यांना समजावून सांगण्याच्या दृष्टीने व्यापक लोक शिक्षण व प्रबोधनासाठी शनिवार दिनांक ११ एप्रिल ते १७ एप्रिल पर्यन्त प्रचार सप्ताह महाराष्ट्रभर पाळण्याचे ठरले. या काळात जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी सभा मेळावे, परिषदा इ. आयोजित करून राखीव जागांबाबतची भूमिका लोकांसमोर मांडण्यात यावी असे ठरले. शनिवार दिनांक १८ एप्रिल रोजी ठिकठिकाणी जिल्हाधिकारी कचेऱ्यांसमोर धरणे धरून वा मोर्चे काढून निवेदन द्यावे असेही ठरले.

(signature) (signature)

( एन.डी. पाटील ) ( सुभाष लोमटे )
निमंत्रक निमंत्रक